आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१७ सप्टेंबर २०२४ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यात सर्वत्र गणेशविसर्जनाचा उत्साह, ठिकठिकाणी मिरवणुका काढत लाडक्या गणरायाला भक्तांचा निरोप

- धुळ्यात विसर्जन मिरवणुकीत तिघांचा मृत्यू, ६ जण जखमी

- सर्व क्षेत्रात मराठवाड्याची प्रगती करणं हेच शासनाचं ध्येय असल्याचं मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं प्रतिपादन

**आणि**

- आशियाई हॉकी अजिंक्यपद स्पर्धेत भारताला सलग पाचव्यांदा अजिंक्यपद

**<><><><><>**

भाद्रपद महिन्यात गणेशचतुर्थी पासून सुरु झालेल्या गणेशोत्सवाची आज सांगता होत आहे. त्यामुळं लाडक्या गणरायाला पुढच्या वर्षी येण्याचं आमंत्रण देत वाजत गाजत निरोप देण्याची चढाओढ राज्यात सर्वत्र दिसून येते आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड व्हाईस कास्ट....(१.२० सेकंद)**

*(मुंबईत लाडक्या बाप्पाला निरोप देण्यासाठी सकाळपासून विसर्जन मिरवणुका काढण्यात येत आहेत. ढोल ताशा लेझीम आणि बाजाच्या संगीतावर उत्फुल्लपणे सर्वजण गुलालाची, फुलांची उधळण करीत आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप देत आहेत. लालबागचा राजा, तेजुकाया मॅन्शन, गणेशगल्ली इत्यादी प्रसिद्ध मंडळांच्या*

*महाकाय मूर्ती मिरवणुकीने निघाल्या आहेत. विसर्जन सोहळ्यासाठी मुंबई महापालिकेने जय्यत तयारी केली आहे. महापालिकेचे सुमारे १२ हजार अधिकारी - कर्मचारी विसर्जन स्थळांवर तैनात आहेत. गिरगाव, दादर, जुहू इत्यादी समुद्रकिनाऱ्यांसह ६९ नैसर्गिक स्थळांसह एकूण २०४ कृत्रिम विसर्जनस्थळांवर विसर्जन सुरू आहे.*

*नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील २२ नैसर्गिक आणि १३७ कृत्रिम अशा १५९ विसर्जन स्थळांवर आज अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणेश मूर्तींचं विसर्जन सुरू आहे. जालना इथल्या मोती तलावात सकाळपासूनच गणेश मूर्ती विसर्जनासाठी गर्दी दिसून येत आहे. महापालिकेने लहान मूर्तींचे विसर्जन करण्यासाठी कृत्रिम हौदाची निर्मिती केली असून मोठ्या मूर्ती क्रेनच्या मदतीने विसर्जित केल्या जात आहेत. गोंदिया शहरात पर्यावरण पूरक पद्धतीनं गणेशमूर्तींचं विसर्जन सुरू आहे. नगर परिषदेच्या वतीने विसर्जन ठिकाणी निर्माल्य गोळा करण्यासाठी घंटागाडीची व्यवस्था करण्यात आली आहे.*

*नागपूरमधे महापालिका प्रशासनाने मूर्तींच्या विसर्जनासाठी कृत्रिम तलावाची व्यवस्था केली आहे. शहरात ३४ ठिकाणी मूर्तींचे विसर्जन होत आहे.)*

***आकाशवाणी बातम्यांसाठी कौस्तुभ पटाईत, मुंबई***

**<><><><><>**

पुणे शहरातल्या कसबा पेठ आणि तांबडी जोगेश्वरी या मानाच्या दोन गणपतींचं विसर्जन झालं आहे. रत्नागिरी जिल्ह्यात आज ३७ हजार ८०५ खासगी, तर ६६ सार्वजनिक गणपतींचं विसर्जन होत आहे. धुळे जिल्ह्यात ४१६ मंडळांकडून गणेश विसर्जन करण्यात येत आहे. यात ३९२ सार्वजनिक मंडळांच्या गणेश मूर्तींचा

समावेश आहे. १३ खासगी तर ११ ठिकाणी एक गाव एक गणपतीचे विसर्जन करण्यात येत आहे.

**बुलढाणा** जिल्ह्यात आज सकाळपासून गणेश विसर्जन सुरू असून शेगावमध्ये झालेले किरकोळ प्रकार वगळता सर्वत्र मिरवणुका शांततेत सुरू आहेत. वाशिम शहरात सकाळपासून विसर्जन मिरवणूक सुरू असून या मिरवणुकीमध्ये डीजे या आधुनिक वाद्यासह पारंपरिक बँड, डफडे, ढोल-ताशे यांच्या गजरात गणपती बाप्पाला निरोप देण्यात येत आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, विविध देशात गणेशोत्सव कशा रीतीनं साजरा होतो हे आपण तिथे राहणाऱ्या नागरिकांकडून जाणून घेत आहोत. आकाशवाणी मुंबईवरून रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय बातम्यामध्ये आज शेवटच्या भागात आपण जाणून घेणार आहोत, अमेरिकेतल्या गणेशोत्सवाविषयी.

**<><><><><>**

धुळे जिल्ह्यात गणपती विसर्जनाच्या मिरवणुकीत ट्रॅक्टरखाली चिडल्यानं तीन मुलांचा मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेत सहा जण जखमी झाले असून त्यांना भाऊसाहेब हिरे शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. धुळ्यातल्या चितोड गावात ट्रॅक्टरवरून विसर्जन मिरवणूक सुरू असताना चालकाचं नियंत्रण सुटल्यानं हा अपघात झाला.

**<><><><><>**

मराठवाड्यातल्या बेरोजगारी, पाणीटंचाई, यासारख्या समस्या सोडवण्यासाठी सरकार वचनबद्ध असून, कृषी, दळणवळण, उद्योग, पायाभुत सुविधा अशा सर्व क्षेत्रात मराठवाड्याची प्रगती करणं हेच शासनाचं ध्येय आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री

एकनाथ शिंदे यांनी केलं. मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त आज छत्रपती संभाजीनगर इथं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. त्यानंतर ते बोलत होते.

**मराठवाड्यातल्या** आठही जिल्ह्यांमध्ये आज ध्वजारोहणाचे कार्यक्रम झाले. परभणी इथं पालकमंत्री संजय बनसोडे, **हिंगोली** इथं पालकमंत्री अब्दुल सत्तार, **धाराशिव** इथं तानाजी सावंत, **जालना** इथं अतुल सावे, **बीड** इथं धनंजय मुंडे, **नांदेडमध्ये** गिरीश महाजन आणि **लातूरमध्ये** जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं.

**तेलंगणामध्येही** आज हैदराबाद मुक्तीसंग्राम दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं.

**<><><><><>**

चीनमध्ये पार पडलेल्या आशियाई हॉकी अजिंक्यपद स्पर्धेत, आज झालेल्या अंतिम सामन्यात भारतानं चीनवर १-० असा विजय मिळवत जेतेपदाला गवसणी घातली. भारताचं हे विक्रमी पाचवं आशियाई विजेतेपद ठरलं आहे.

सामन्याची पहिली तीनही सत्र गोलशून्य बरोबरीत राहिली. त्यानंतर चौथ्या सत्रात भारताचा जुगराज सिंग यानं ५१व्या मिनिटाला सामन्यातला एकमेव आणि निर्णयक गोल करत भारताला विजय मिळवून दिला.

या सामन्यात चीननं भारताला चांगली लढत दिली मात्र, भारताचा गोलरक्षक क्रिषन पाठक आणि सुरक्षा फळीनं, चीनला यश मिळू दिलं नाही.

**<><><><><>**

मणिपूरमध्ये कायमस्वरूपी शांतता प्रस्थापित करण्यासाठी केंद्र सरकारनं आराखडा तयार केला असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातल्या तिसऱ्या कार्यकाळात केंद्र सरकारला १०० दिवस पूर्ण झाल्यानिमीत्त त्यांनी आज नवी दिल्लीत बातमीदारांशी संवाद साधला.

मणिपूरमधला हिंसाचार वांशिक स्वरुपाचा आहे, आणि तो रोखण्यासाठी सरकार कुकी आणि मैतेई या दोन्ही समुदायांसोबत चर्चा करत आहे, असं त्यांनी सांगितलं. तिथली परिस्थिती लवकरच पूर्वपदावर येईल अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

संरक्षण क्षेत्रात भारताला आत्मनिर्भर बनवण्यासाठी केंद्र सरकार वचनबद्ध असल्याचं संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. केंद्र सरकारच्या कार्यकाळाचे १०० दिवस पूर्ण झाल्यानिमीत्त ते आज बातमीदारांशी बोलत होते.

<><><><><>

केंद्रातल्या राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारनं आपल्या तिसऱ्या कार्यकाळाच्या सुरुवातीच्या १०० दिवसात प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमातंर्गत सुमारे ३ हजार ४८ कोटी रुपयांचं कर्ज वितरित केलं आहे. केंद्रीय सुक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग मंत्री जितन राम मांजी यांनी आज नवी दिल्ली इथं वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. या कार्यक्रमातंर्गत २६ हजारापेक्षा जास्त सुक्ष्म उद्योग सुरु झाले असून सुमारे २ लाख १० हजार रोजगार संधी निर्माण झाल्या, असं ते म्हणाले.

गेल्या १०० दिवसात सरकारनं ९ पायाभूत सुविधा प्रकल्प मंजूर केले. त्यामुळे ११ कोटी मनुष्यदिवस इतकी रोजगारनिर्मिती होणार असल्याचं केंद्रीय कामगार मंत्री मनसुख मांडविय यांनी सांगितलं. केंद्रीकृत निवृत्तीवेतन,

व्यवस्थेअतंर्गत येत्या १ जानेवारीपासून निवृत्त कर्माचाऱ्यांना त्यांच्या जवळच्या बँकेतून निवृत्ती वेतन मिळणार असल्याचं त्यांनी नमूद केलं.

गेल्या ९ वर्षात देशातल्या दूधउत्पादनात ५७ टक्क्यापेक्षा जास्त वाढ झाली असल्याचं, केंद्रीय मत्सोउद्योग, पशुपालन आणि दुग्धउत्पादन मंत्री राजीव रंजन सिंग यांनी सांगितलं. मत्स्य उत्पादनातही चांगली वाढ झाली असून त्याबाबत भारत दुसऱ्या स्थानावर आहे, असं ते म्हणाले. २०१३-१४ मधे देशातलं मत्सउत्पादन ९५ लाख टनापेक्षा जास्त होतं. ते २०२२-२३ मधे १ कोटी ७५ लाख टनाच्या वर गेलं. ही वाढ ८३ टक्के आहे, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ७४व्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. मोदी यांनी त्यांच्या कार्यातून देशाची समृद्धी आणि प्रतिष्ठा उंचावली आहे. त्यांना निरोगी आणि आनंदी दीर्घायुष्याच्या शुभेच्छा, असं राष्ट्रपती मुर्मू आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हणाल्या आहेत. तर मोदी यांनी प्रधानमंत्री पदाच्या कार्यकाळात भारताला विकासाच्या मार्गावर नेलं असल्याचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांनी अथक परिश्रम, चिकाटी आणि दूरदृष्टीनं नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणत देशाला जगात नवी प्रतिष्ठा मिळवून दिल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

दलितांच्या आरक्षणाला कोणी हात लावू शकत नाही, त्यांचं आरक्षण आहे तसंच राहील, असं केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास

आठवले यांनी म्हटलं आहे. ते आज पालघर जिल्ह्यात डहाणू इथं दिव्यांग बांधवांसाठी आयोजित कार्यक्रमात बोलत होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त केंद्र सरकारच्या एडिप योजनेअंतर्गत दिव्यांगांना मोफत सहायक उपकरणांचं वाटप यावेळी आठवले यांच्या हस्ते करण्यात आलं. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी परदेशात जावून केलेल्या वक्तव्याचा मोठा फटका काँग्रेसला येत्या निवडणुकीत बसेल, असं मत त्यांनी कार्यक्रमानंतर बातमीदारांशी बोलताना व्यक्त केलं.

**<><><><><>**

लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविषयी केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्य प्रकरणी बुलडाण्याचे शिवसेना आमदार संजय गायकवाड यांच्याविरुद्ध बुलडाणा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकणात, अनेक ठिकाणी विदर्भात काही ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामा विभागानं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**